पोलीस महासंचालक, यांचे वतीने पोलीस संशोधन केंद्र, पुणे संस्थेने दिनांक 05/12/2024 रोजी सकाळी 11:00 वाजता स्व. वसंत केशव सराफ, सेवा निवृत्त पोलीस महासंचालकआणि प्रथम मानद संचालक पोलीस संशोधन केंद्र पुणे यांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम पोलीस संशोधन केंद्र, पुणे येथे पार पडला.

श्री. प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांनी या प्रसंगी स्व. श्री सराफ यांचा जीवन परिचय उपस्थितांसामोर मांडला. यानंतरसेवा निवृत्त पोलीस महासंचालक श्री. एम. एन. सिंग व श्री. ए. व्ही. कृष्णन यांनी आणि सेवा निवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक, डॉ. माधव सानप, यांनी स्व. श्री सराफ यांच्या आठवणीना उजाळा दिला.

या कार्यक्रमास श्री. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. दीपक पांडे, अपर पोलीस महासंचालक, दळण वळण व परिवहन, श्री. शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त,पिंपरी चिंचवड, श्री. अरविन्द चावरिया, अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर, डॉ. जालिंदर सुपेकर, विशेष पोलीस महानिरीक्षक, सुधार सेवा, श्री. सारंग आव्हाड, श्री. बसवराज तेली, पोलीस उप महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, लाच-लुचपत प्रतिबंधक विभाग, श्री. जी. श्रीधर, पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे हे सध्या सेवेत असलेले अधिकारी यासोबत सेवा निवृत्त पोलीस महासंचालक - श्री. प्रवीण दीक्षित, श्री.दत्ता पडसलगीकर, श्री. नारायण स्वामी, सेवा निवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक –श्री. ए. डी. जोग, डॉ संजय शिंदे, श्री. एस. डी. पारधी, श्री. प्रकाश मुत्याळ, श्री.रामराव वाघ व इतर पोलीस अधिकारी, अंमलदार, व मान्यवर यांचेसह स्व. सराफ यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

श्रीम. ज्योती क्षीरसागर, पोलीस अधीक्षक पोलीस संशोधन केंद्र यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले.




Shri. V.K. Saraf

